**ओलावा**

एक काळ होता,
जेंव्हा इथे भावना...
दुथडी भरून वाहायच्या !
किती बोलू, किती नको...
अशा विचाराला,
वाव सुद्धा नसायचा !
आता प्रवाह कमी झालाय...
भावना आटल्यात -
की, राहिलेच नाहीये काही...
बोलण्यासारखे?
वरून सगळेच शांत...
गोठून थिजलेल्या
बर्फाच्या स्तरासारखे,
अचल, अव्यक्त -
आत तरी उरलीये का,
खळबळ काही?
खरं सांगायचं तर -
मला माहीत नाही!
.........
.....
माहीत नाही:
का होत नाहीत आता
पूर्वी सारख्या कविता
का दाटत नाही मनात,
ती हुरहूर, अस्वस्थता...
का नाही फुलत डोळ्यात,
खुळावलेली स्वप्नं?
का नाही जमत वहीत,
फुलं-पानं जपणं?

का वाटतं सगळंच आता,
वेडं आणि बालिश?
येतं का मन थाऱ्यावर,
वय गाठता चाळीस?
हरवल्यासारखं वाटतं काही,
एवढं मात्र खरं...
टचकन आले भरून डोळे कधी,
तर आत-खोल वाटतं बरं !
कोरड्या पडत चाललेल्या संवेदनेला,
तेवढा ओलावा बरा वाटतो....
हे काय कमी आहे निदान -
तेवढा क्षण खरा वाटतो !!

**- © प्रीती देशपांडे**
preeti.deshpande5@gmail.com
https://www.meetipreeti.com/